**प्रेस नोट** **दिनांक १५/०३/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## हरवलेल्या शाईन गाडीचा शोध घेवुन गाडी मालकास दिलेबाबत

दिनांक ११/०३/२०१९ रोजी पो.हवा खोत,पो.ना साबळे, पो.कॉ चांगण,पो.कॉ.गोपणर असे धानोरी पोलीस चौकीत हजर असताना इसम नामे तुषार जाधव वय ३० वर्षे रा धानोरी हे सकाळी १०.४५ वा सुमारास चौकीस येवुन त्यांची शाईन गाडी नंबर एम.एच १६ ए.डी २३६१ ही समिक्षा हॉटेल समोरुन चोरीस गेलेबाबत तक्रार देण्यास चौकीस आले असता वरिल सर्व कर्मचारी घटनास्थळी जाऊन शोध घेता सदर पार्कींग मध्ये शाईन गाडी नं एम.एच २३ व्ही ९६३५ ही गाडी मिळुन आली आम्ही सदर गाडी बाबत खात्री करता यातील तक्रारदार व प्रकींग मध्ये मिळुन आलेली शाईन गाडी ह्या गाड्या सारख्याच असल्याने नजर चुकीने सदर गाडी एक इसम घेवुन गेला होता. त्यांचा शोध घेतला असता तो मिळुन आला त्यास चौकीस बोलावुन खात्री करून कागदपत्रे पाहुन सदर गाड्या मालाकांचे ताब्यात देण्यात आल्या आहे.गाडी मालकांनी सदर कर्मचा-याचे आभार मानले आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवा चंद्रशेखर खोत, पो.ना नितीन साबळे व पो.शि योगेश चांगण , पो.शि शिवाजी गोपणर विश्रांतवाडी पोलीस स्टेशन यांनी केली आहे.